म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय का-वा
दा. क्र. ३९०

# मराठे देशींचा राजा

BVBK-0400360

# मगध देशीचा राजा

## महानंद

आपला बिहार नावाचा प्रांत. पूर्वी त्यालाच मगध देश असे म्हणत. गंगामाई वहाते त्या देशातून. अन् गंगा-माईला मिळणाऱ्या किती तरी नद्या. या नद्यांमुळे जमीन खूप सुपीक. पण आपल्या इकडल्यासारखे लहानमोठे डोंगर नाहीत बरं का तिकडे ! नुसती सपाट शेतंच शेतं !

त्या मगध देशातली गोष्ट. केव्हा घडलेली ? दोन अडीच हजार वर्षांपूर्वी.

मगध देशात महानंद नावाचा राजा राज्य करायचा. त्याच्या प्रधानाचे नाव राक्षस. राक्षस म्हणजे मोठ्या दातांचा, क्रूर, दुष्ट नव्हे बरं का ! नुसता नावाचा राक्षस. भारी चांगला. त्या राक्षसाच्या हाती सगळा राज्यकारभार.

राज्यात लोक कसे काय वागतात, कोणी कोणावर जुलूम करतो आहे की काय, कोणी दुसरा राजा मगध देशावर स्वारी करतो आहे की काय, हे सगळे राक्षसाने पाहायचे. राजाला काहीच करावे लागायचे नाही.

झाले ! अगोदरच राजाला राज्यकारभार करायचा भारी उल्हास, आणि त्यात राक्षसासारख्या एका चांगल्या प्रधानाचा सहवास ! मग कशाला देतोय् राजा कारभारा-कडे लक्ष !

तो आपला शिकार, नृत्य, गीते, सहली यांच्यांतच मग्न राहायला लागला ! राक्षसानं वारंवार जाऊन राजाला म्हणावं,

' महाराज ! '

‘काय आहे अमात्य ?’

‘आपण एकदा दरबारात येऊन प्रजेला दर्शन –’

‘करायचं काय ? तुम्ही सगळा बंदोबस्त ठीकठाक ठेवला आहे ना ?’

‘होय ! पण –’

‘तर मग आम्ही शिकारीला निघालो आहोत. शिकारीहून परतल्यावर वाटलं तर येऊ दरबारात !’

राक्षस बिचारा एवढेसे तोंड घेऊन परत जायचा !

## चाणक्य

एकदा पुरुषपुराहून--पेशावरहून--एक विद्वान् ब्राह्मण मगधाची राजधानी पाटलीपुत्र इथे आला. तो काही उगीच आला नाही.

शिकंदराने हिंदुस्थानावर केली स्वारी. पटापट इथले राजे त्याला शरण जायला लागले. पंजाबचा राजा पर्वतेश्वर, या एकट्यानेच काय ती त्याच्याशी झुंज दिली. बाकी सगळी सिंहासने शिकंदराच्या पुढे माना खाली घालून उभी राहिली !

आपल्या देशावर दुसऱ्या देशातल्या लोकांनी स्वारी करावी, अन् आपल्या लोकांनी मेंढरांसारखे माना खाली घालून ते हाकतील तिकडे जावे, हे त्या ब्राह्मणाला-विष्णुगुप्ताला-मुळीच आवडले नाही. पण करील काय बिचारा ?

तो न्यायशास्त्र शिकला होता. व्याकरणशास्त्र त्याने पाठ करून टाकले होते. साहित्यशास्त्रात तो पंडित होता. आणखीही किती तरी शास्त्रे त्याला येत होती.

पण शत्रूचा पराभव काही नुसत्या पुस्तकी विद्येने होत नाही. त्याच्यासाठी हवीत माणसे. अन् नुसती हात-पाय धड असलेली माणसे तरी काय उपयोगाची ? त्यांचे आपल्या मायदेशावर प्रेम असायला हवे. कोणी जर आपल्या मातृभूमीवर हल्ला करू लागला, तर त्यांना राग यायला हवा. त्यांच्या मुठी वळायला हव्यात. त्यांचे ओठ चावले जायला हवेत.

ही अशी माणसे काही विष्णुगुप्ताला--चाणक्याला--पंजाबात सापडेनात. म्हणून मग तो मगध देशात आला.

अगदी साधा ब्राह्मण. एक नेसते धोतर. अंगावर एक उपरणे. डोक्यावर भली लांब शेंडी. झाला संपला पोषाख.

तो पाटलीपुत्रात आला. राजाची भेट घ्यायची खूप खटपट केली त्याने. रोज दरबारात जायचा. राजवाड्या-भोवती चकरा घालायचा. राक्षसालाही भेटून पाहायचा प्रयत्न केला त्याने.

पण साधा दरिद्री ब्राह्मण ! राजाची तर राहोच, राक्षसाचीही भेट होईलसे दिसेना ! राजवाड्यावरचे पहारेकरी उर्मट ! ते याची चेष्टा काय करीत ! थट्टा काय करीत !

बिचारा चाणक्य अगदी निराश झाला. एवढ्यात त्याने ऐकले, की एका वाड्यात एक मोठा भोजनसमारंभ होणार आहे, अन् तिथे राजा येणार आहे. त्याला वाटले, छान आहे ही संधी. त्या भोजनसमारंभातच राजाला गाठावे अन् त्याला आपल्या देशाची ही दुर्दशा ऐकवावी.

तो त्या वाड्याच्या दाराशी येऊन पोचला. तिथे खूप लोक येत होते. त्यांच्याबरोबर चाणक्यही आत शिरला. त्याला कुणीही अडवले नाही.

वाड्यात सारे एकच गडबड चालली होती. रांगोळ्या, पाट, उदबत्त्या, सोन्याचांदीची ताटे असा सारे थाट होता तिथे. चाणक्य आत शिरला अन् एका बाजूला कोपऱ्यात जाऊन राजाची वाट पाहात बसला.

थोडा वेळ तसाच गेला होता. मग एक उर्मट माणूस येऊन चाणक्याला डाफरला,

'ए ! ऊठ तिथून !'

चाणक्याला हे ऐकून भारी राग आला. त्याच्यासारख्या विद्वान् ब्राह्मणाचा हा अपमान त्याला कसा सहन होईल ? पण त्याने राग दाबून ताठ स्वरात विचारले,

'का ?'

'का ? कुणी निमंत्रण दिलं होतं तुला ? म्हणे क्याँ ! उठतोस की नाही ?'

'मला महाराजांना भेटायचं आहे. अन् मी तुमच्या नगरात पाहुणा आलो आहे --'

'अरे जा ! म्हणे पाहुणा ! मोठा ऋषिमुनीच पडला की नाही महाराजांना भेटायला ! चल ऊठ !'

आता मात्र चाणक्य संतापला. तो आपले हात छातीशी बांधून म्हणाला, 'नाही उठत ! मी काही जेवायला आलो नाही इथं ! पण राजाची भेट झाल्याशिवाय काही मी जाणार नाही इथून.

त्या दोघांचे हे भांडण ऐकून आणखी काही लोक गोळा झाले तिथे. ते सगळे चाणक्याची थट्टा करायला




लागले. कोणी त्याला दरिद्री म्हटले, कोणी हडकुळा. कुणी लोचट म्हटले, कुणी चिकट.

शेवटी त्या उर्मटाने चाणक्याचा अगदी दंडच धरला अन् त्याला ओढले. चाणक्य जळत्या आगीसारखा भडकला. तो काही तरी बोलणार, एवढ्यात महाराजा महानंद आपल्या अनुचरांबरोबर तिथे येऊन पोचला. ही गडबड पाहून त्याने विचारले,

'काय आहे तिकडे ? '

लगेच ही ही ही दात काढीत दोघेचौघे पुढे धावले. एकजण म्हणाला, 'सम्राट ! हा कोणी उपटसुंभ न बोलावताच इथं ठाण मांडून बसला आहे ! आपल्याला भेटायचं म्हणतोय्, किती हाकललं तरी जात नाही. '

राजाला पाहून चाणक्याला मोठा आनंद झाला. त्याला वाटले की राजाची बरी भेट झाली. पंजाबातली केविलवाणी स्थिती सांगावी, अन् ग्रीकांचा पराभव करण्यासाठी त्याला विनंती करावी. तो पुढे झाला आणि म्हणाला,

'सम्राटांचे कुशल असो ! मी --'

मोठमोठ्याने हसत महानंद म्हणाला,

'आमच्याकडे येणारे सगळेच लोक आम्हाला असाच आशीर्वाद देतात. तू इथं का आलास ? तुला बोलावलं होतं ? कुणाला विचारून आलास तू ? '

चाणक्याची मुद्रा बदलत चालली. तो म्हणाला,

'कुणी कुणाला बोलावलं नसलं, तरी देशावर आलेलं संकट –'

'तुला भिकाऱ्याला या पंचायती कुणी सांगितल्या ?' राजा आपल्या अनुचरांकडे वळून त्यांना म्हणाला, 'या आगाऊ भटुरड्याला बाहेर हाकून द्या ! '

अनुचर धावले. त्यांनी चाणक्याला धरले, आणि ते त्याला फराफरा बाहेर ओढू लागले. त्या ओढाओढीत चाणक्याच्या शेंडीची गाठ सुटून ती मोकळी झाली.

चाणक्याने ओठ चावीत मोठ्याने ओरडून राजाला म्हटले,

'उन्मत्त राजा ! मी तुला जागं करायला आलो होतो ! तू या देशाला संकटमुक्त करशील, अशी माझी कल्पना होती ! पण तू आपलं कर्तव्य विसरला आहेस ! ठीक आहे ! तुला गादीवरून काढून तुझ्या जागी दुसऱ्या कुणाला बसवीन ! अन् मग त्याच्या हातून ग्रीकांचा पराभव करीन ! तरच मी नावाचा चाणक्य ! तोपर्यंत शेंडीची गाठ बांधणार नाही ! '

राजा थोडेसे हसला. ते पाहून भोवतालच्या लोकांनी फिदीफिदी हसत दात बाहेर काढले.

चाणक्याला राजाच्या सेवकांनी नगराबाहेर हाकून दिले.

# मुरा राणी

महानंदाची एक राणी. तिचे नाव मुरा.

मुरा ही हिमालयातल्या एका भिल्ल राजाची मुलगी. महानंदाचा सेनापती भागुरायण याने त्या राजाला जिंकले, अन् त्याने मुरेला तिथून आणून महानंदाशी तिचे लग्न

लावून दिले. पोर भिल्लाची, पण अशी देखणी अन् तरतरीत ! महानंदावर तर जणू भुरळ पडली. तो रात्रंदिवस तिच्याच महालात राहायचा. दुसऱ्या राण्यांकडे जायचाच नाही !

यामुळे बाकी सगळ्या राण्या मुरेचा मत्सर करायला लागल्या. त्यांनी अशी बातमी दिली उठवून, की मुरा एका दासीची मुलगी आहे ! ती काही चांगल्या घराण्यातली नाही !

एके दिवशी देवदर्शनाला गेला असता महानंदाने हे ऐकले. त्याने थोडासा विचार करावा की नाही ? पण स्वतः विचार करील तर तो राजा कसला ? त्याने तावडतोब हुकूम सोडला--

'कोण आहे रे तिकडे ?'

एक पहारेकरी धावत आला. हात जोडून तो म्हणाला :

'काय आज्ञा आहे महाराज ?'

'मुराला पकडून कैदेत टाका !'

पहारेकऱ्याला काही कळेना. तो भांबावला. राजा ओरडला,

'पहातोस काय ? टाक कैदेत !'

पहारेकऱ्याने इकडे तिकडे पाहिले. शेजारी दुसरा एक दास उभा होता. मुरारी त्याचे नाव. पहारेकऱ्याने मुरारीचे बकुट धरले, अन् त्यालाच धरून तो ओढायला लागला. मुरारी बिचारा गयावया करीत म्हणू लागला,

'महाराज, चूक झाली ! क्षमा करा ! पुन्हा नाही

करणार असे ! '

राजाला हसू आवरेना. तो म्हणाला,

' मूर्ख आहेस झालं ! अरे त्याला नव्हे ! आमच्या मुरा राणीला ! '

पहारेकरी आणि सैनिक मुरेकडे धावले. त्यांनी जेव्हा तिला धरून कारागृहाकडे चालविले, तेव्हा ती म्हणाली,

' अरे ! मला कुठे नेता ? '

' कारागृहात ! '

' का ? '

' महाराजांची आज्ञा आहे म्हणून ! '

' पण मी काय केले आहे रे ! '

' आम्हाला माहीत नाही ! '

' पण मला तर लहानसे बाळ होणार आहे ! '

' ते आम्हाला काही सांगू नका ! '

बिचारी मुरा कारागृहात पडली. तिने राजाला भेटवण्यासाठी तुरुंगाच्या अधिकाऱ्याची विनवणी केली, प्रार्थना केली, पण त्याला मुळी मुरेचा छळ करा, अशी राजाचीच आज्ञा. मग तो तरी काय करणार ?

मुरा खाईना, पिईना. वाळून चालली बिचारी !

शेवटी एके दिवशी तिला एक गोजिरवाणे बाळ झाले. राजाने मुरेला एक रत्नांनी जडवलेला ताईत दिला होता. तो मुरेने त्या बाळाच्या दंडात बांधला. तिला वाटले, हे गोजिरवाणे लेकरू पहायला तरी महाराज येतील !

पण राजा आला नाही; दुसऱ्या राण्या पाळतीवर

होत्याच. एका रात्री मुरा त्या बाळाला कुशीत घेऊन झोपली असता त्यांनी तिच्या कुशीतून ते बाळ पळवले. बाहेर एक घोडेस्वार तयारच होता. तो ते बाळ हातात घेऊन भरधाव निघाला. हिमालयाच्या दक्षिणेकडील एका वनात त्याने ते बाळ एका झाडाखाली ठेवून दिले. त्याला वाटले, उगीच याला मारा कशाला ? आता लांडगे येतील अन् या बाळाचा करतील चट्टामट्टा !

पण देव तारी त्याला कोण मारी !

त्या बाळाचे काय झाले ? .....कळेल पुढे.

दुसरे दिवशी सकाळी मुरा जागी झाली, अन् पहाते तो बाळ नाही ! ती किंचाळली,

' माझ्या चिमण्या ! कुठे गेलास रे ? '

## चंद्रगुप्त

चाणक्य जो पाटलीपुत्राहून निघाला, तो उत्तरेकडे हिमालयाच्या शेजारी असलेल्या वनात जाऊन पोचला. तिथे त्याने एक झोपडी बांधली, अन् त्या झोपडीत तो राहू लागला.

दहावीस विद्यार्थी त्याच्याकडे शिकायला येत. त्यांना शिकवून झाल्यावर तो एखाद्या झाडाखाली बसून विचार करी.

' आमच्या भारतावर शत्रूंनी केलेला हा हल्ला कसा परतवता येईल ? हा महानंद राजा नालायक आहे. त्याच्या हातून काहीही व्हायचे नाही. त्याला गादीवरून काढून

दुसरा कोणी तरी चांगला तरतरीत मुलगा गादीवर बसवायला हवा. ''

' पण हे जुळणार कसे ? मुलगा कुठे शोधायचा ? '

' बरे, सापडला मुलगा, तरी त्याला गादीवर कसा बसवायचा ? '

खूप विचार करी चाणक्य. अन् शेवटी तो म्हणे,

' होईल काही तरी. चांगले संकल्प करावेत, की फळही चांगले मिळते. मी आमच्या देशावरचा हल्ला परतवण्याठीच खटपट करीत आहे. केव्हा ना केव्हा तरी यश येईलच. '

एके दिवशी चाणक्य दुसऱ्या एका आश्रमात गेला. तिथून परतताना त्याला एका झाडाजवळ एक दहा वर्षाचा मुलगा दिसला. चांगला चुणचुणीत, गोरागोरापान, देखणा. तो मुलगा झाडावरच्या एका फळाला बाण मारीत होता.

चाणक्य पहातच उभा राहिला ! मुलाने धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून जो बाण सोडला, तो खप्पदिशी त्या फळात घुसला, अन् त्याच्या वेगामुळे फळ तुटून आकाशात खूप उंच उडाले.

' शाब्बास गड्या ! तू त्या फळासारखा महानंदाला उडवून लावून तुझ्या कीर्तीचे निशाण असेच आकाशात फडकत ठेवणार ! ' असे म्हणत चाणक्य त्या मुलाजवळ गेला. त्याच्या पाठीवर हात फिरवीत चाणक्याने विचारले,

' बाळ ! तू राहतोस कुठे ! '

' माझ्या बाबांच्या घरी. '

' तुझे बाबा कुठे राहतात ? मला दाखवतोस का? '

'चला ना!'

तो मुलगा चाणक्याला घरी घेऊन गेला. ती झोपडी एका वनरक्षकाची होती. वनरक्षक लाकडे फोडीत होता. त्याच्याकडे बोट दाखवून मुलगा म्हणाला,

'हे माझे बाबा!'

चाणक्याने त्या काळ्याकुट्ट, राकट चेहऱ्याच्या वनरक्षकाकडे पाहिले. त्याचा काही या गोष्टींवर विश्वास बसेना! तो मुलाला म्हणाला,

'बाळा! तुझा हात पाहू?'

मुलाचा हात आपल्या हाती घेऊन चाणक्याने त्यावरील रेषा पाहिल्या, अन् तो एकदम म्हणाला,

'साफ खोटं!'

वनरक्षक पुढे येत म्हणाला,

'आचार्य! काय खोटं!'

'हा मुलगा तुमचा नव्हे! याच्या हातावर चक्रवर्ती राजाची चिन्हे आहेत. अहो वनरक्षक, तुम्ही माझ्याशी खरे बोलाल काय? मी तुमचे काहीही वाईट करणार नाही!'

वनरक्षक मान खाली घालून म्हणाला,

'बोलेन!'

'तर मग या मुलाची जन्मकथा सांगा मला!'

'ती मलाही माहीत नाही! एके दिवशी सकाळी मी वनात हिंडत असता मला हे लेकरू सापडले. त्याच्या हातावर बांधलेल्या एका ताइताखेरीज त्याच्या अंगावर दुसरे काहीही नव्हते!'

'तो ताईत मला दाखवाल काय?'

वनरक्षक झोपडीत गेला, आणि एका मडक्यात घालून ठेवलेला तो ताईत आणून त्याने चाणक्याचे हाती दिला. त्याकडे पहाताक्षणीच चाणक्याने ओळखले, की हे मगध देशाचे राजचिन्ह आहे !

सगळ्या गोष्टी विजेसारख्या त्याच्यासमोर चमकून गेल्या !

तो त्या वनरक्षकाला म्हणाला,

'अहो वनरक्षक ! या मुलाचे चांगले व्हावे असे तुम्हाला वाटते काय ?'

'होय ! अवश्य वाटते.'

'तर मग तुम्ही याला माझ्या स्वाधीन करा. मी या मुलाला विद्या पढवीन, आणि मग काय काय करता येईल ते पाहीन ! याचे नाव मी 'चंद्रगुप्त' असे ठेवतो. या गोष्टीला तुमची काही हरकत आहे काय ?'

'मुळीच नाही. कुणीकडून हे देवाचे देणे योग्य उपयोगाला लागले म्हणजे झाले. हे शालजोडीचे ठिगळ माझ्या फाटक्या गोधडीला शोभत नाही ! याला नीट सांभाळा !'

'त्याची तुम्ही मुळीच चिंता करू नका !'

वनरक्षकाने चंद्रगुप्ताला जवळ घेऊन त्याचा एक मुका घेतला आणि त्याला चाणक्याच्या स्वाधीन केले.

# पाटलीपुत्र

त्यानंतर दहा वर्षांची गोष्ट. एक तरुण शिष्य आणि एक वयस्कर गुरुजी, असे दोघे पाटलीपुत्रास निघाले होते.

या दहा वर्षांत महानंदाच्या स्वभावात काही बदल झाला होता की काय ?

मुळीच नाही. पूर्वीचाच आळशीपणा, उर्मटपणा, बावळटपणा, अगदी तेच. एक गोष्ट मात्र झाली होती. अलीकडे त्याने मुरेला महालात ठेवले होते. मुरेने एके दिवशी केली गंमत.

महानंदाचा युवराज सुमाल्य याला व्हायचा होता यौवराज्याभिषेक. त्या दिवशी तिने राजाकडे आपल्या दासीच्या हाती पाठविले एक पत्र. त्यात तिने लिहिले,

'महाराज ! आज किती आनंदाचा दिवस ! सुमाल्याला आज अभिषेक होतो आहे. किती चांगला मुलगा आहे सुमाल्य ! तो आपल्या प्रजेला खरोखरच सुखी करील. एवढंसंही दुखवायचा नाही, त्याला माझे अनंत आशीर्वाद ! '

राजाने ते पत्र वाचले. त्याला भारी आश्चर्य वाटले. त्याची कल्पना होती की मुरा सुमाल्याचा द्वेष करीत असेल. पण ते काही खरे नाही ! हिचे किती प्रेम आहे सुमाल्यावर !

राजाच्या मनात काय आले कोण जाणे ! तो उठला, आणि पत्र घेऊन आलेल्या दासीला म्हणाला,

'तुझ्या मालकिणीला जाऊन सांग, की महाराज तुझ्या महालात येताहेत. '

अन् खरोखरीच राजा मुरेच्या महालात गेला.

मुरेला असा काही आनंद झाला की ती राजाची मनापासून सेवा करू लागली. झाले; राजाने हुकूम सोडला,

'आता आम्ही इथेच राहणार! राक्षसांना म्हणावे, राज्याचा बंदोबस्त तुमचा तुम्ही पाहून घ्या!'

नेमक्या याच वेळी चाणक्य आणि चंद्रगुप्त, दोघे पाटलीपुत्राला पोचले.

चंद्रगुप्ताला धर्मशाळेत बसायला सांगून चाणक्य मुरेच्या महालात जाऊन पोचला. मुरेची भेट झाल्यावर त्याने तिला खंडीभर आशीर्वाद देऊन सांगितले---

'मी आपल्या भावाकडून आलो; त्याने त्याच्या मुलाला इथे आपल्याजवळ पाठविले आहे. तो म्हणतो की, चंद्रगुप्त इथे आपल्याजवळ राहून राज्यकारभार कसा करावा ते शिकेल.'

मुरेची माहेरच्या माणसांशी खूप दिवसांत भेट झाली नव्हती. तिला चाणक्याला भेटून खूप आनंद झाला. ती म्हणाली,

'कुठे आहे माझा भाचा?'

'धर्मशाळेत थांबला आहे तो.'

'त्याला इकडे केव्हा आणाल?'

'आपण सांगाल तेव्हा.'

'मग घेऊन या ना! मला त्याला फार पहावंसं वाटतं आहे!'

चाणक्याला आणखी काय पाहिजे होते? त्याने चंद्रगुप्ताला वाड्यात आणले. त्याला पहाताक्षणी मुरेला एकदम धक्का बसला!

कारण चंद्रगुप्त आणि मुरा ही दोघे अगदी सारखी दिसत! पण लगेच सावरून मुरेने चंद्रगुप्ताची राजाशी

ओळख करून दिली. राजालाही चंद्रगुप्ताला पाहून आनंद झाला.

चाणक्य मनात म्हणाला,

'चला ! सुरुवात तर छान झाली !'

## हाहा:कार

चाणक्य एक एक युक्ती योजायला लागला.

मंत्री राक्षस अन् सेनापती भागुरायण यांचे आपापसात बरे नव्हते. चाणक्याने भागुरायणाची ओळख करून घेतली. त्याला इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून त्याच्यावर चांगली छाप पाडली. मग एके दिवशी हळूच तो भागुरायणाला म्हणाला,

'काय हो, हा चाललेला राज्यकारभार तुम्हाला आवडतो ?'

'ढीग नाही आवडत! पण करता काय?' भागुरायण म्हणाला.

'आणि तुम्ही मुरा राणीशी महाराजांचे लग्न लावून दिलेत, तिला एक मुलगा झाला होता–'

'हो ! मग ते बाळ नाहीसे झाले ! '

'बरे, तुमचे महाराज कसे काय आहेत ?'

'कशाचे महाराज ! महाराजांचे दर्शन कुठे घडतंय प्रजेला ! नुसते नावाचे महाराज ! आम्हाला त्या राक्षसाच्याच आज्ञा पाळाव्या लागतात ! '

चाणक्याने टाकला डाव. तो जवळ सरून म्हणाला,

'आणि हे ग्रीक लोक आपल्या देशावर स्वारी करून आले आहेत, इथं राहून सारे मजा करताहेत –'

'असा आवेश येतो, त्या सगळ्यांना सिंधु नदीत बुडवावं! पण करणार काय? महाराजांना कुठं हवं आहे लढायला?'

'आता उगीच एक गंमत म्हणून विचारतो, मुरेचा तो मुलगा जर तुम्हाला भेटला, तर तुम्ही काय कराल?'

'काय करीन? काय वाटेल ते करून त्याला राज्यावर बसवीन!'

'अशी गडबड करून नाही भागायचे भागुरायणा? राक्षस मोठा शहाणा माणूस. तो काही तुम्हाला हे करू द्यायचा नाही!

भागुरायण गोंधळला. तो आपला नुसताच सेनापती. डोकं चालवायचा नाही! मग चाणक्याने सांगितली एक युक्ती. भागुरायणाला ती फार आवडली.

एवढ्यावर चाणक्य स्वस्थ कुठला बसायला! तो मुरेकडे वारंवार जायला लागला. ब्राह्मण मोठा निर्लोभी. नदीच्या काठी एका झोपडीत रहायचा. कोणाकडून एक छदामही घ्यायचा नाही. त्यामुळे मुरेचा त्याच्यावर बसला विश्वास. तिलाही त्याने एक युक्ती सांगितली न् ती तिच्याकडून करवून घेतली.

मुरा अलीकडे राजाला फार जपायला लागली. एकदा एक दासी एका सोन्याच्या करंड्यात काही अनरसे घेऊन राजाकडे आली, अन् म्हणाली,

'महाराजांचा जयजयकार असो! अनरसे आपल्याला भारी आवडतात, म्हणून महाराणीने हे करून धाडले आहेत.'

राजा हात पुढे करणार, तोच मुरेने ते घेतले, आणि ती दासीला म्हणाली,

'महाराणीला म्हणावे, अनरसे पोचले.'

दासी गेल्यावर राजा अनरसा खाणार, एवढ्यात मुरेने त्याचा हात धरला अन् ती म्हणाली,

'थांबा महाराज!'

'का?'

मुरेची आवडती मांजरी शेजारीच बसली होती, तिला मुरेने जवळ घेतले अन् तिच्यापुढे अनरशाचा एक तुकडा टाकला.

पण मांजरी अनरसा खाईना!

मुरेने बळेबळे तिच्या तोंडात अनरसा कोंबला! थोड्याच वेळात ती मांजरी गिरक्या घेऊन मरून पडली!

राजा संतापला! 'महाराणीला ठार मारतो' म्हणाला! पण मुरेने त्याला आवरले. ती म्हणाली,

'मला दुःख दिलेत, तेवढे पुरे! आता आणखी कोणाला दुखवू नका!'

मात्र राजाला ती आपल्या महालातून बाहेर जाऊ देईनाशी झाली.

राक्षसाला काय करावे ते कळेना. राजा दरबारात येत नाही, मुरेच्या महालात बसला आहे. तिच्या घरी कोणी चंद्रगुप्त म्हणून तिचा भाचा आला आहे, नदीकाठी

एक नवीनच ब्राह्मण येऊन उतरला आहे, तो कोणाकडून काही घेत नाही, मुरेच्या त्याच्याशी वारंवार गाठीभेटी



होतात, हे सगळे काय आहे ते राक्षसाला उमगेना.

शेवटी एकदा कसला तरी सण आला. त्या सणाच्या

दिवशी राजाने दरबारात यावे, असा राक्षसाने आग्रह केला. मुरेनेही हजार शपथा घालून जा म्हणून सांगितले.

सणाचा दिवस उजाडला. राजा मुरेच्या महालातून बाहेर पडला. बरोबर मारे हत्ती, घोडे, अबदागिरी, भालदार, चोपदार असा थाट. स्वारी राजवाड्याकडे चालली, तोच वाटेत एका स्वाराने दौडत येऊन राक्षसाच्या हाती एक पत्र दिले. राक्षसाने ते वाचले. कपाळाला आठ्या घालून तो मागे फिरला.

राजा मारे डौलात पुढे चालला. आता तो राजवाड्यात शिरणार, एवढ्यात–

एवढ्यात राजा, त्याचा हत्ती, बरोबरचे स्वार, सगळे भस्सदिशी जमिनीच्या पोटात गेले! रस्त्याला भला थोरला खळगा पडला. त्या खळग्यातून पाचपन्नास भिल्ल पुढे सरसावले आणि त्यांनी 'राक्षस महाजकी जय!' असे म्हणत त्या सगळ्यांची डोकी उडवली!

सगळा हाहा:कार माजला! त्यातच मुरा धावत आली. तिनेही राजाच्या बरोबर गर्तेत उडी घेतली आणि खंजीर पोटात खुपसला! मरताना ती म्हणाली,

'कसा सूड घेतला!'

## अमात्य

राक्षसाला जे पत्र मिळाले, त्यात लिहिले होते,

'आपल्या निमंत्रणाप्रमाणे मगध देशावर स्वारी करण्यासाठी मी माझे सैन्य घेऊन आलो आहे!

आपला,

पर्वतेश्वर,

राक्षस अगदी बावरला. त्याला बिचाऱ्याला चाणक्याचा बेत कसा कळणार ?

चाणक्यानेच हा सगळा बनाव घडवून आणला होता ! मुरेला त्यानेच आपल्या बाजूला वळवून घेतले. अन् तिच्या मनात राजाचा सूड घ्यायचे भरवून दिले. त्याने राक्षसाच्या नावाने त्याच्या एका मित्राला पत्र पाठविले, अन् त्याच्याकडून राजवाड्याजवळचे भुयार खणवले. राक्षसाला आयत्या वेळी बाजूला काढले. मारेकऱ्यांना राक्षसाचा जयजयकार करायला सांगितले. लोकांना वाटले, राजाला राक्षसानेच मारविले !

इकडे त्याने पर्वतेश्वराला राक्षसाच्या नावाने पत्र धाडले.

'तुम्ही येऊन मगधावर स्वारी करा. मी गुप्तपणे तुम्हाला मदत करीन. पण उघडपणे मात्र मी महानंदाच्या बाजूचा ! '

त्याप्रमाणे पर्वतेश्वर लांब लांब मजला मारीत मगधाजवळ येऊन थडकला ! चाणक्याने शिकविल्याप्रमाणे भागुरायण मात्र स्वस्थ राहिला.

आता चाणक्याने ठरविले की, लोकांचे प्रेम चंद्रगुप्तावर बसेल असे करायचे. याच वेळी त्याने भागुरायणाला ताईत दाखवला. भागुरायणाला असा आनंद झाला ! त्याने आपली सगळी सेना चंद्रगुप्ताच्या स्वाधीन केली.

शूर चंद्रगुप्त सैना घेऊन पर्वतेश्वरावर कोसळला. पर्वतेश्वर बिचारा गफलतीत बसून राहिला होता. त्याला वाटले, राक्षस आपल्याला मदत करणारच आहे, मग आपण कशाला तयारीत राहा? पण चंद्रगुप्ताने त्याचा असा काही पिट्टचा पाडला आहे, अगदी पळता भुई थोडी झाली त्याला! सगळे लोक चंद्रगुप्ताचा जयजयकार करायला लागले. त्यांना वाटले, या वेळी चंद्रगुप्त नसता तर आटपलेच होते!

आता मात्र राक्षस पुरा पुरा गोंधळला! त्याला चाणक्याचा हा डाव कळू लागला. पण फार उशीर झाला त्याला!

सगळी प्रजा त्याला शिव्या द्यायला लागली. राक्षस चिडला, चरफडला. पण आता चिडून अन् चरफडून काय होणार?

शेवटी त्याने पाटलीपुत्र सोडायचे ठरविले. तो मनात म्हणाला,

'मी जर इथेच राहिलो, तर हे दुष्ट लोक मला ठार मारतील! त्यापेक्षा बाहेर कुठे तरी जावे, कुणा दुसऱ्या राजाची मदत मिळवावी अन् मग त्याच्या मदतीने या सगळ्या चोरांचा पराभव करावा!'

मग राक्षसाने आपली बायकामुले, आपला मित्र चंदनदास याच्या घरी पाठविली अन् तो रात्री गुपचुप नगराबाहेर पडला!

बिचारा राक्षस!

# पौर्णिमा

पण राक्षस बाहेर गेला, हे चाणक्याला बरे कसे वाटेल ?

राक्षस फार चांगला मंत्री. न्यायी, हुशार, अन् स्वामिनिष्ठ. तेव्हा काही तरी करून त्याला पाटलीपुत्रात आणून चंद्रगुप्ताचा मंत्री करायला हवे.

चाणक्याजवळ युक्त्यांना काय तोटा ?

पुढल्या पौर्णिमेला चंद्रगुप्ताने आज्ञा केली, की पर्वतेश्वराचा पराभव झाला, म्हणून लोकांनी दिवाळी-सारखे घरोघर दिवे लावावेत.

त्या दिवशी संध्याकाळी चंद्रगुप्त आपल्या महालाच्या गच्चीवर उभा राहिला. त्याने पहारेकऱ्याला विचारले,

‘ आज पौर्णिमा ना ? ’

‘ होय, महाराज ! ’

‘ मग लोकांनी आमच्या आज्ञेप्रमाणे दिवे का नाही लावले ?’

पहारेकरी मान खाली घालून उभा राहिला.

चंद्रगुप्त म्हणाला,

‘ बोलत का नाहीस ? ’

‘ महाराज ! आर्य चाणक्यांनी नको म्हणून सांगितले ! ’

रागाने पाय आपटून चंद्रगुप्त म्हणाला,

‘ लोकांना आज्ञा कोणी करायची ! मी की गुरुजींनी ? गुरुजींना बोलावून आणा ! ’

थोड्याच वेळात चाणक्य महालात आला. चंद्र-गुप्ताला आशीर्वाद देऊन तो म्हणाला,

'चंद्रगुप्ता ! कशाला बोलावलेस मला ?'

'गुरुजी, एकदाचे ठरून जाऊ द्या. लोकांनी कोणाचे ऐकायचे ? तुमचे की माझे ?'

'का ? काय झाले ?'

'लोकांना दीपोत्सव करू नका, असे कोणी सांगितले ?'

'मी सांगितले.'

'का ?'

'कारण अजून उत्सव करायचे दिवस आले नाहीत !'

चंद्रगुप्त ताडकन् उठून म्हणाला,

'तर मग मी आज्ञा केली, ती फुकटच गेली म्हणायची !'

चाणक्य रागावला. तो म्हणाला,

'असे काय ? तर मग सांभाळ तुझे राज्य ? मला ब्राह्मणाला काय ? कुठेही जाऊन राहीन ! चार विद्यार्थ्यांना शिकवीन तर माझे पोट भरेल.'

चाणक्य ताडकन् पाय आपटीत महालातून बाहेर निघून गेला.

लगेच त्याने एका विश्वासू दूताकरवी ही बातमी राक्षसाच्या कानावर घातली. राक्षस आनंदाने म्हणाला,

'बरी पडली फूट ! अशांचे असेच व्हायचे !'

# चंदनदास

राक्षसाला बनविण्यासाठी चाणक्याने हे लटकेच भांडण केले होते.

पण एवढ्यानेच चाणक्याचा डाव पुरा झाला नाही.

एके दिवशी राक्षस उदासवाणा रानात एकटाच फिरत होता. तो मनात म्हणाला,

'काय मजा आहे पहा ! काही दिवसांपूर्वी मी या राज्याचा प्रधान होतो. अन् आता रानावनातून वणावणा भटकतोय. खायला नाही, प्यायला नाही! माझ्या बायको-मुलांचे काय झाले असेल कोण जाणे !'

एवढ्यात त्याला एक माणूस दिसला.

एका झाडाला दोरी बांधून तो त्या दोरीत आपला गळा अडकवीत होता.

राक्षस धावत त्याच्याजवळ गेला अन् त्याचा हात धरून त्याला म्हणाला, 'मित्रा, काय करतोस हे ?'


तो माणूस आपला हात राक्षसाच्या हातून सोडवीत म्हणाला, 'चला, बाजूला व्हा !'

'पण हे काय करतो आहेस ?'

'जीव देतोय ! दिसत नाही का ? की तुम्ही त्या राक्षसासारखे आंधळे आहात ?'

एक उसासा सोडून राक्षस म्हणाला,

'का बाबा ? राक्षसाने काय केलेन् ?'



‘ आणखी काय करायला हवे ? राजा मेला, पर्वतेश्वर चाल करून आला तरी हा आपला माशा मारीत खुशाल झोपा काढीत होता ! ’

खरे आहे तुझे म्हणणे! राक्षस अगदीच बावळट होता! राक्षस म्हणाला.

'हं! पुरे आता. चल बाजूला हो.'

'अरे, पण तू जीव का देतो आहेस?'

'मग जगून काय करू? माझा मित्र आज फासावर लटकणार. मग मी जगून काय करू? मी काही दुष्ट राक्षसासारखा कृतघ्न नाही!'

पुन्हा राक्षस चमकला! तो म्हणाला,

'राक्षसानं कृतघ्नपणा केला?'

'होय. त्याने खुशाल आपली बायकामुले दिली चंदन-दासाच्या घरी ठेवून, अन् आपण हिंडतोय मजा मारीत. पण चंदनदास माझा मित्र, तो जर फाशी जातोय, तर मला मरायलाच हवे. चल, बाजूला हो!'

राक्षस चांगलाच हादरला. चंदनदास त्याचा मित्र होता. त्याने दोर धरून ठेवून त्या माणसाला विचारले,

'चंदनदास का फाशी जातोय?'

'आता का तुला सगळे सांगत बसू? चाणक्याला हवा आहे राक्षसाचा अन् त्याच्या पोराबाळांचा पत्ता, चंदनदास तो सांगत नाही. म्हणून त्याला आज फाशी देणार आहेत!'

राक्षस त्याचा हात ओढीत म्हणाला,

'मित्रा, चल माझ्याबरोबर.'

'कुठे?'

'फाशी देतात तिथे.'

'कशाला?'

'आपण त्यांना राक्षसाचा पत्ता सांगू.'

'तुला काय माहीत?'

'बाबा, मीच तो हतभागी राक्षस!'

त्या माणसाने फडाफडा तोंडात मारून घेतल्या अन् तो म्हणाला,

'महाराज! क्षमा करा बरं का मला! तुम्हाला नाही नाही ते बोललो--'

'क्षमा मग करू! अगोदर चल माझ्याबरोबर!'

ते दोघे जे धावत निघाले, ते एका क्षणाचा विसावा न घेता फाशीच्या जागी जाऊन पोचले.

तिथे चंदनदास गळ्यात तांबड्या फुलांच्या माळा घालून उभा होता. त्याची बायको, मुले शेजारी उभी राहून रडत होती. चंदनदास त्यांना समजावीत म्हणत होता--

'रडता कशाला? मी काही चोरी केली नाही, की दरोडा घातला नाही. मित्राकरिता फाशी जातोय मी. रडू नका.'

सैनिकांनी चंदनदासाला धरून फाशीच्या खांबाजवळ नेले. ते त्याच्या गळ्यात दोरी अडकविणार--

एवढ्यात त्यांना हाक ऐकू आली

'थांबा, मी राक्षस आलो आहे!

BVBK-0400360

## गोड शेवट

थोड्याच वेळात तिथे चाणक्य, चंद्रगुप्त, भागुरायण ही सगळी मंडळी येऊन पोचली. चाणक्य येताक्षणीच राक्षसाला म्हणाला, 'अमात्य राक्षस, नमस्कार!'